## संक्षिप्त परिचय

# डॉ. रणजितसिंह डिसले

डॉ. रणजितसिंह डिसले हे भारतातील पहिले शिक्षक आहेत ज्यांना 7 कोटी रुपयांचा ग्लोबल टीचर पुरस्कार 2020 साली मिळाला . जगप्रसिद्ध अशा हार्वर्ड विद्यापीठातून शैक्षणिक धोरण या विषयात पदवी प्राप्त करणारे ते एकमेव सरकारी शिक्षक असून जागतिक बँकेचे शिक्षण विषयक सल्लागार म्हणून त्यांनी 4 वर्षे काम केले आहे. सन 2009 पासून सोलापूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत 15 वर्षे अध्यापनाचे काम केलेलं आहे. तंत्रज्ञांनाच्या माध्यमातून नावीन्यपूर्ण पद्धतीने अध्यापन करण्यासाठी ते विशेष ओळखले जातात.



# विस्तृत परिचय



*Ranjitsinh*

परितेवाडी सारख्या छोट्याशा खेडेगावात शिक्षक म्हणून काम केलेले डॉ. रणजितसिंह डिसले हे भारतातील पहिले शिक्षक आहेत ज्यांना 7 कोटी रुपयांचा ग्लोबल टीचर पुरस्कार 2020 साली मिळाला . जगप्रसिद्ध अशा हार्वर्ड विद्यापीठातून शैक्षणिक धोरण या विषयात पदवी प्राप्त करणारे जिल्हा परिषदेच्या शाळेतील एकमेव शिक्षक असून जागतिक बँकेचे शिक्षण विषयक सल्लागार म्हणून त्यांनी 4 वर्षे काम केले आहे. तंत्रज्ञांनाच्या माध्यमातून नावीन्यपूर्ण पद्धतीने अध्यापन करण्यासाठी ते विशेष ओळखले जातात. शैक्षणिक उपक्रम, शिक्षकांच्या समस्या, मुलांचे शिक्षण आणि तंत्रज्ञान या विषयावर ते मराठी आणि इंग्रजी भाषेतील वृत्तपत्रात सखोल लेखन करतात. डिसले गुरुजीनी तयार केलेली QR कोडेड पाठ्यपुस्तके आज भारतातील 5 कोटींहून अधिक विद्यार्थी वापरत असून यामुळे सरकारी शाळेतील गुणवत्ता वाढण्यास मदत झाली आहे.

शैक्षणिक धोरण निर्मिती करणारे आणि हे धोरण ज्यांच्यासाठी बनवले जाते असे  विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील दरी भरून काढण्यासाठी ते समावेशक धोरण निर्मिती करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.